**नि.फौ.ख.क्र. ३७/२०१६**
सरकार – वि.- खंडु खराडे
**निशाणी क्र. २२**

**<u>सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ -</u>**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – बेबी सुदाम थोरात - **पोलीस साक्षीदार**
वय – ३८ वर्षे, व्यवसाय – महिला पोलीस हवालदार बं. नं. १३६१, पुणे लोहमार्ग पो. स्टे.
सध्या रा. - रेल्वे पोलीस लाईन औंध रोड, पुणे.

**<u>फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम २९९ प्रमाणे, सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यु. पी. ठाकरे यांचे मार्फत सुरु-</u>**

दिनांक १५.०२.२०१६ रोजी मी महिला पोलीस शिपाई या पदावर पुणे लोहमार्ग पोलीस स्टेशन, येथे कार्यरत होते. त्यादिवशी पोलीस उपनिरीक्षक शिंदे यांना गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, चार पाच दिवासापुर्वी जुन्या पादचारी पुलावरती मोबाईल चोरानारे चोरटे फिरत असल्याबाबत माहिती मिळाली. त्यानुसार पोलीस हवालदार १०५१ कदम, व पोलीस शिपाई जुनरे व मी असे मिळुन पादचारी पुलावर गेलो. तेथे आम्हांला संशयीत इसम मिळुन आले. त्यांना ताब्यात घेतले पंचाना बोलावुन घेतले. आरोपीची अंगझडती घेतली असता, आरोपी क्र. १ खंडु खराडे याच्याकडे सॅमसंग कंपनीचा मोबाइल मिळुन आला. तो मोबाईल पंचनामा आधारे जप्त करण्यात आला. आरोपीस कदम यांनी या गुन्हयात अटक केली. मी जप्त मोबाईल व आरोपीला पाहिल्यास ओळखु शकते. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर नाही.

**सरतपास पुर्ण .**

**<u>आरोपी हा फरार असल्याने उलटतपास नाही.</u>**

**फेरतपास नाही.**

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2026.08.25 16:05:47 +0530

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

दि. २५/०८/२०२६
स्थळ - पुणे

**(एन.जे.चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.